# स्वयंसाक्षांकन घोषणा पत्र / प्रतिज्ञा पत्र

मी , -------------------------------------------------------------------
श्री / श्रीमती -------------------------------------------------------------------------- यांचा मुलगा / मुलगी
वय ------- वर्षे , आधार क्र. ----------------------------------------- व्यवसाय ------------------------------
राहणार -----------------------------------------

मी स्वयं घोषित करतो /करते कि , इचलकरंजी महानगरपालिकेकडे प्रधानमंत्री आवास योजनेत , मी CSC centre / citizen application / महानगरपलिकेकडील अर्ज स्वत: भरला आहे . याची पात्रता तपासणेसाठी विहित पुराव्याच्या स्वयं सांक्षाकित केलेल्या प्रती या मुळ कागद पत्रांच्या सत्य प्रती आहेत , त्या खोट्या असल्याचे आढळून आल्यास , भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये आणि / किंवा संबधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

मी, याद्वारे प्रतिज्ञापत्रावरती सत्य कथन करून प्रतिज्ञा करतो /करते कि ,प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत असलेल्या पात्रता व निकषांस अनुसरुन खालील अटी व शर्ती मी पूर्ण करीत असलेबाबतचे हमीपत्र मी देत आहे .

१. माझे व माझ्या कुटुंब सदस्याचे नावे आज रोजी भारतात कोठेही पक्के घर नाही .
२. मी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असून माझ्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.----------------------------इतके आहे . सोबत तहसीलदार यांचेकडील चालू वर्षाचा उत्पन्न दाखला जोडला आहे .
३. मी अथवा माझे कुटुंब सदस्य यांनी गेल्या २० वर्षात झोपडपट्टी विकास / रमाई आवास योजना / IHSDP, प्रधानमंत्री आवास योजना – १ अथवा इतर कोणत्याही घरकुल संदर्भातील योजनेतून कोणत्याही प्रकारचा लाभ घेतलेला नाही.
४. योजनेचा लाभ घेण्यासाठी महापालिकेकडून बांधकाम परवानगी घेणे व घरकुल पूर्ण झाले नंतर महापालिकेकडून पूर्णत्व प्रमाणपत्र सादर करणे मला बंधनकारक आहे .
५. योजनेंतर्गत घरकुल मंजुरीनंतर किमान ३० चौ मी.चे पक्के घर (RCC) विहित वेळेत बांधून मी पूर्ण करेन .
६. या योजनेतून मंजुरीनंतर मिळणारे अनुदान (२.५ लाख रुपये) शासनाकडून महानगरपालिकेस प्राप्त झालेनंतर घरकुल बांधकामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने लाभार्थीला अदा करण्यात येईल, याची मला कल्पना आहे .
७. योजनेतील अनुज्ञेय अनुदाना व्यतिरिक्त उर्वरीत रक्कम ( रु .अंदाजे ५ ते ९ लाख ) स्वहिस्सा म्हणून स्वउत्पन्नातून किंवा बँक कर्जाद्वारे उभे करून मंजूर घरकुल [किमान ३० चौ मी.चे पक्के घर (RCC)] पूर्ण करण्याची जबाबदारी माझी आहे .
८. सदर घरकुलाचा वापर केवळ स्वतः रहाण्यासाठी करणे बंधनकारक आहे तसेच हे घरकुल भाड्याने देता येणार नाही किंवा विकता येणार नाही याची आम्हाला जाणीव आहे .
९. मी योजनेतील केवळ एकाच घटकाचा लाभ घेणार आहे .
१०. घरकुल पूर्ण झाल्यानंतर विहित नमुन्यात योजनेचा लाभ घेतल्याचा बोर्ड लावण्याची जबाबदारी माझी आहे .
११. सदर घरकुल योजनेत मी पात्र ठरल्यास घरकुल आम्हा पती-पत्नी दोघांच्या नावाने वितरीत होईल व घरकुलाची मालकी पती पत्नी दोघांच्या नावे राहील यासाठी आम्ही संमती देत आहोत .

वरील प्रतिज्ञापत्रातील सर्व नमूद मुद्दे योजनेचा लाभ घेणेसाठी मला बंधनकारक असून त्याचे पूर्ण पालन मी करेन , अशी हमी मी देत आहे. तसेच वरील सर्व माहिती खरी असून खोटी नमूद नाही, तसेच भविष्यात यामध्ये तफावत आढळून आल्यास भारतीय न्याय संहिता २०२३ कलम 336 (2) (3) (4) , कलम 340 नुसार होणाऱ्या शिक्षेस मी पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

पद -
ठिकाण :- ---------------------- प्रतिज्ञा करणाऱ्याची सही / अंगठा :------------------------
दिनांक :- ---------------------- प्रतिज्ञापत्र करणाऱ्याचे नाव :- -----------------------------
मोबाईल क्रमांक :- ---------------------------------------

**समक्ष :-**

अधिकारी नाव : -----------------------------
पद : ----------------------------------------
सही : -------------------------------------